ISSN–2278-5655

AMIERJ

AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– III May - June 2021

# ' गोतावळा ' कादंबरीचा भाषिक अभ्यास

डॉ. व्ही .बी . राठोड

Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at http://www.aarhat.com/amierj/

।।१।।

आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास पाहिला तर आपल्या असे लक्षात येते की स्वातंत्र्यपूर्व कालखंडातही ग्रामीण विषयावर लेखन होत होते. मात्र स्वातंत्र्योत्तर कालखंडात ग्रामीण साहित्य लिहिले गेले ते आगळे वेगळेच आहे. कारण स्वातंत्र्यपूर्व कालखंडात ग्रामीण भागाचे चित्र पाहिजे तसे चित्रित झालेले दिसत नाही. कारणे अनेक असू शकतात. त्यातील एक कारण आपल्याला इंग्रजांचे वर्चस्व नाकारून समाजाला स्वतंत्र होण्यासाठी प्रवृत्त करणे हे पहिले कर्तव्य साहित्यिकांनी मानले. स्वातंत्र्योत्तर कालखंडात विशेषत: साठोत्तरी कालखंडात ग्रामीण विषयावर मोठ्या प्रमाणात लेखन होवू लागले. ग्रामीण भागातील विषय विशेषत: शेती आणि शेतकरी यांच्याशी निगडित विषयावर लेखन मोठ्या प्रमाणात झाले. काव्य, कथा, कादंबरी, नाटक, ललितगद्य अशा सर्वच प्रकारातून ग्रामीण विषय हाताळला जावू लागला. त्यामुळे मोठ्या प्रमाणात साहित्याची निर्मिती झाली. मराठी साहित्यात हे साहित्य ***ग्रामीण साहित्य*** म्हणून ओळखले जावू लागले. एक स्वतंत्र वाङ्मयीन प्रवाह मानता येईल इतके प्रभावी आणि परिणामकारक लेखन ग्रामीण साहित्यात होवू लागले. ग्रामीण साहित्याला दर्जा व मान सन्मान प्राप्त करून देण्यात काही साहित्यिकांनी मोलाचे योगदान दिले त्यात आनंद यादव यांचे नाव अग्रस्थानी घ्यावे लागते. कारण आनंद यादवांनी हवेतून चालणाऱ्या ग्रामीण साहित्याला प्रथमत: जमिनिवर उतरून चालायला शिकविले. आनंद यादवांनी सर्वच प्रकारातून ग्रामीण विषय मांडून ग्रामीण साहित्याची भक्कम अशी पायाभरणी केली. त्यामुळे आज ग्रामीण साहित्य मराठी वाङ्मयाच्या इतिहासात आपले स्थान निर्माण करण्यात यशस्वी ठरले आहे.

।।२।।

साठोत्तरी काळात ग्रामीण साहित्यात विशेषत: ग्रामीण कादंबरीत विशेष लेखन झाले त्यातील काही महत्त्वाच्या कादंबऱ्यांची नावे घेता येतात - टारुफुला ( शंकर पाटील ), पाचोळा ( रा.रं.बोराडे ), राब ( अनंत मनोहर ), गांधारी

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– III May - June 2021

( ना.धों. महानोर ), कागूद व सावली ( आनंद पाटील ), कोंडुरा ( चि.त्र्यं.खानोलकर ), इंधन ( हमीद दलवाई ), धग ( उध्दव शेळके ), देवकी ( मधु मंगेश कर्णिक ), मृण्मयी ( गो.नी.दांडेकर ), करुणाष्टक ( मांडगुळकर ) माझं गाव ( रणजित देसाई ), सारे प्रवासी घडीचे ( जयवंत दळवी ), वेडी बाभळ ( रंगनाथ देशपांडे ), रानगंगा ( अण्णाभाऊ साठे) या सर्वात महत्त्वाची भविष्यातील आदर्श ग्रामीण कादंबरी म्हणून कोणत्या कादंबरीकडे अंगुलीनिर्देश करता येईल? असा प्रश्न निर्माण झाला तर सहज आपण आनंद यादवांच्या ***गोतावळा*** या कादंबरीकडे पाहतो. आनंद यादवांनी सर्वच साहित्यप्रकारात लेखन केले आहे. हिरवे जग ( १९६०) पहिला काव्यसंग्रह, मळ्याची माती ( १९७८ ) दुसरा काव्यसंग्रह, मायं लेकरं ( १९८९ ) दीर्घकवितासंग्रह, खळाळ ( १९६७ ) कथासंग्रह, घरजावई ( १९७४), माळावरची मैना (१९७१), आदिताल ( १९८० ), डवरणी ( १९८२ ), उखडलेली झाडे ( १९८६ ) हे कथासंग्रह. रात घुंगराची ( १९७८ ) वगनाट्य, स्पर्शकमळे ( १९७८ ) व पाणभवरे ( १९८२ ) हे ललित लेखन. गोतावळा ( १९७१ ), नटरंग ( १९८० ), माऊली ( १९८५ ), झोंबी ( १९८७ ), नागंरणी ( १९९० ), घरभिंती ( १९९२ ) या त्यांच्या कादंबऱ्या प्रकाशित झालेल्या आहेत. आनंद यादवांनी अनेक समीक्षात्मक ग्रंथही लिहिले त्यात - ग्रामीण साहित्य : स्वरुप आणि समस्या( १९७९), ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव ( १९८१ ) राज्य पुरस्कार प्राप्त, मराठी साहित्य , समाज आणि संस्कृती ( १९८५ ), साहित्याची निर्मिती प्रक्रिया ( १९८९ ) या सर्व वाङ्मयीन कर्तृत्वाचा आढावा घेतांना असे लक्षात येते की, आनंद यादवांनी आपले बहुतांशी लेखन हे ग्रामीण विषयावरच केलेले आहे. ग्रामीण साहित्य समृध्द करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

**।।३।।**

इ.स. १९७१ मध्ये प्रकाशित झालेली आनंद यादव यांची मराठी वाङ्मय विश्वातील अतिशय नामांकित कादंबरी म्हणजे ' गोतावळा '. ' गोतावळा ' या कादंबरीने मराठी कादंबरी विश्वातील निकष बदलून टाकले. मौज प्रकाशनाने कोल्हापूर परिसरातील कागलच्या प्रदेशातील बोली भाषेचा प्रभाव असणारी ' गोतावळी ' ही कादंबरी प्रकाशित केली. आनंद यादवाने ही कादंबरी २१ प्रकरणात आणि १४३ पानात लिहिली आहे. या कादंबरीचा नायक नारबा हिच्या तोंडून निवेदनाच्या आधारे सांगितली गेलेली ही कादंबरी आहे. आनंद यादवांनी नंतर इ.स. १९८० मध्ये ' नटरंग ' , इ.स. १९८० मध्येच ' एकलकोंडा ', इ.स. १९९० मध्ये ' झोंबी ', इ.स. १९९२ मध्ये ' घरभिंती ', व नंतर ' नांगरणी ' अशा ग्रामीण कादंबऱ्या लिहिल्या. मात्र सर्वात सरस अशी कादंबरी म्हणून आजही ' गोतावळा ' या कादंबरीचा होतो. आनंद यादव यांच्या प्रत्येक कादंबरीचा आशय विश्व हा वेगवेगळा आहे. ' गोतावळा ' कादंबरीने

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– III May - June 2021

तर कादंबरी विश्वालाच नवे परिमाण देण्याचे काम केले आहे. निसर्ग आणि माणूस यांच्यातील भावसंबंध आपल्या प्रतिभेचा विषय बनवून जो आविष्कार केलेला आहे तो अलौकिक आहे. मराठी कादंबरी विश्वात एक मैलाचं दगड म्हणून ' गोतावळा ' या कादंबरीकडे लेखक, वाचक व समीक्षक पाहतात. नारबा या कादंबरीचा नायक आहे. या कादंबरीत रामू सोनवडे, त्याची बायको, मालकीण, गंग्या, सित्या, विकास, हिंदुराव, सावित्री आणि ड्रायव्हर व पाव्हणा या गौण, दुय्यम व्यक्तिरेखा आहेत. सोन्या, चाण्या, ओपाला आलेली पाडी, नाग्या, वाघ्या बैल, राम्या, भिम्या रेडे, म्हालिंगा बैल , चंपी कुत्री , म्हारूत्या घोडा , कोंबडा, कोबंडीची पिल्लं, राजा कुत्रा, कासव , शेळीची बकरं आणि इतर पशुपक्षी , झाडं झुडपं ही नारबाच्या गोतावळ्यातील आहेत. नारबाच्या भावविश्वात या सर्वांना महत्त्वाचे स्थान आहे. रामू सोनवडे , ड्रायव्हर पाव्हणा हे खलनायकासारखे वागतात. त्यांच्यामुळे नारबाचे भावविश्व उध्वस्त होते.

।।४।।

कोल्हापूरातील कागल परिसरातील भौगोलिक प्रदेश या कादंबरीला पार्श्वभुमी म्हणून आनंद यादवांनी घेतली आहे. त्यामुळे या कादंबरीत विविध पिके , झाडे , पशुपक्षी यांचे वर्णन फारच सुंदर उतरले आहे. खळ्याच्या ऊसाचं वाढलेलं वाडं , नदिची गवत , कडबा, शोंगाच साल, तुरीचं कोंड, तुरकाड्या पडल्या हुत्या. हे पिकाचं वर्णन तसेच लिंळिबिंचे झुडूप घाणीरंड, करंजीची हिरवी झाडं, उंबर, चिंच, पिंपळ, वड, इत्यादी वृक्ष आणि घुबडं , कोल्ही वांदरे, मुंगुस, चित्तुर, मोर, टिटवी इत्यादी पशुपक्ष्यांचा उल्लेख यातून हा प्रदेश जिवंत स्वरूपात आपल्यापुढे उभा राहतो. भात काढून थोडं आडसाली माळत केल हुतं. ऐनं वक्ताला माळवं. तालुक्याच्या बाजारात न्हेऊन पैसं करायच्या मालकाला नाद लागलेला. माळ्याच्या आवडात काटं, वाळकं, भेंड्या दोडकं नि वांगी भराला आली हुती. ( पृष्ठ - ११८ ) हे माळवं खाण्यासाठी डोंगरावरून उतरणारी वांदरं नारबाला दिसतात. माळरानं , डोंगर , मळा आणि तळ , नदी विशिष्ट पिके यांच्या वर्णनातून कोल्हापूरचा ग्रामीण परिसर जिवंत होतो. या प्रदेशातील निसर्ग एक पात्र म्हणूनच आलेला दिसतो. कृषी जीवनात ऋतू चक्राला विशेष महत्त्व असते. त्या रंग बदलणाऱ्या ऋतुचे वर्णन स्वाभाविकपणे आलेले आहे. नारबाच्या मानसिकतेनुरूप आलेले हे वर्णन अधिकच खुमासदार झालेले आहे. " - - - आभाळात वांझ ढग आलेलं, अजुनही वावटळू न्हाई का वादळ न्हाई - - - कुठं गेला असल ह्यो पाऊस ? आत्ता लागायचा कवा नि पेरण्या हुयाच्या कवा ? वैरणीचा तुटवडा पडत चाललाय - - - पिकाला पाणी तर आजिबात न्हाई. चाळीस चिरपाणी प्यायचं तिथे आता आढ धिरसुदीळ पीना झाल्याम. पाटातनं पाणी ऊसाला येईस्तवर हिरीतलं

पाणी संपतयं - - - आतापतोर जीव जतन केल्यागत ऊस . त्योबी वाळून चाललाय - - - पड बाबा एकदा पुढ कव्हातरी वड खा वाटलचं तर खर दुष्काळ नग पाऊ - - - ( पृष्ठ - ३३ ) उन्हाळा दुष्काळाच्या वर्णनाप्रमाणेच पावसाळ्याचे वर्णन - - - ( पृष्ठ - ९२ - ९३ ) देखील लोकजीवनावर प्रभाव गाजविणारे असे आहे. गोतावळा नारबाची दैनदिनी आहे. त्यावर आघात होतो तेव्हा तो म्हणतो , " मोटा हुत्या तवा मला पाटंपासनं गजबजायचा क्षणी अगवाय उठायचं त्यास्नी वैरणी टाकायच्या माझी शेणघाण भरायची गडबड नि ढोरांची गपागपा वैरणी खाऊन मोटला जायची गडबड. दिसांचा गोंडा म्हवराय मोटांची झुम्मड , चाकाचा नाद , लावण्या , लिकडं तिकडं मारलेला हाका - - - असा मळा रामपाऱ्यात उठून देवाचं नाव घेत उद्योगाला लागलेला. एखादा चिरा प्याला की, मग दिसाचं उगवनं. पाटाच्या पाण्यात किरणाच्या आंघुळी - - - ( पृष्ठ - १३७ ) स्वाभाविक कृषी जीवनावरचं यंत्र संस्कृतीने आघात केला. " - - - सित्या गंग्या यायच बंद होऊन आजचा पाचवा दीस. परवा दिशी मोटपावाणीच्या गळ्यातला नाडा सोडून काढून तिला न्हवरा बाईगत केलेलं. नाडा सोडून चाककणा , शिवाळ , नाडा समदं खोली लावून मरगळ खोपड्याला रचलेलं. मोटा पारभात आणून बाजूला अंधारात टांगण्याला टांगलेला. आता त्यास्नी कव तर उंदरं कुरतडणार. भिंगरीसारख्या फिरलेल्या मोटा आता कायमच्या बंद. ", " - - - आता माझं तोंडबी बंद. नुसतं ड्रायव्हरच्या गत. त्यो सांगल तेवढंच करायचं. - - - नाऱ्या कर, नाऱ्यानं करायचं. नाऱ्या ऊठ नाऱ्यानं उठायचं. नाऱ्या बसं नाऱ्यानं बसायचं. समदं ड्रायव्हर म्हणल तस - - - चाळ्याचा एकच पाय मोडला , पर माझ आता हात नि पाय दोन्हीबी काढून घेतली जाणारं. नाऱ्या बंद. ( पृष्ठ - १४१ ) याचा अर्थ असा की, मोट नाडा आणि नाऱ्या बंद म्हणजे पारंपरिक गावगाडाच उखडला गेला. ग्रामीण समाजजीवन ढवळून निघाले. बलुतेदारांचा रोजगार बंद झाला. शेवटी तर ' सोसंवत नसेल तर तुझी वाट तू धरं ( पृष्ठ - १४० ) असे मालक सांगतो.

।। ५ ।।

आधुनिकीकरणाच्या प्रभावाने ग्रामीण समाज जीवनात झालेल्या बदला संदर्भात **डॉ. रा. भा. मंचरकर** म्हणतात - " भारतीय शेतमजूर अधिक सोशिक , सहिष्णू आणि सौजन्यशील नसते तर मालकाच्या शेतावर आणि जनावरांवर, पिकांवर त्याचे प्रेम असते. म्हणून बेंदुराच्या दिवशी हालिंग्या बैलाला अंडे देण्यास मालक विरोध करतो, तेव्हा नारबा नारबा त्याचा विरोध मोडून काढतो. असे असले तरी मालकाविरूध्द तो विद्रोह कधीच करीत नाही. नारबा संयमी , सहिष्णू आहे.अपवादाने तो ड्रायव्हर दिसतो." समाजव्यवस्थेमध्ये श्रमिक उत्पादकांचा कष्टकऱ्यांचा एक वर्ग आहे. त्याचप्रमाणे अनुत्पादक परोपजीविचा दुसरा वर्गही आहे. नारबा, गंग्या , सित्या इत्यादी कष्टकरी किंवा गायी, म्हैस,

बैल, रेडे इत्यादी उपयुक्त प्राणी हे उत्पादक वर्गाचे प्रतिनिधी आहेत. तर रामू सोनवडे , पाव्हणा, कोल्हे , वानर, गाढव, आणि पक्षी हा अनुत्पादक परोपजीविचा दुसरा वर्ग आहे. याची जाणीव कादंबरी वाचतांना होते." प्रा. या. वा. पडस्कर या कादंबरीच्या संदर्भात म्हणतात की, " पाव्हण्याचे हातपाय बारक्या पोरागत बिनकामानं मऊ मऊ दिसतील." म्हणजे हा शहरी माणूस श्रमिक वर्गातला नसून बांडगूळ दलाल वर्गातला आहे. मालक, दलाल व श्रमिक असे तीन वर्ग या ठिकाणी एकत्र आलेले आहेत. परिवर्तनाच्या काळामध्ये कमिशनवर डोळा ठेवून यंत्राचे महत्त्व शहरातील लोक शेतकऱ्यांना सांगू लागले. पाव्हणा रामू सोनवाड्याच्या ट्रॅक्टरच्या शेतीचे महत्त्व पटवून देतो आणि ट्रॅक्टर खरेदी करण्यास उद्युक्त करतो. यावरून यंत्रयुगात धूर्त, हिशेबी आणि स्वार्थी वृत्ती कशी वाढली. शेतकऱ्यांचा उपयुक्ततावादी दृष्टिकोन लेखकाने मालकाच्या रूपाने टिपला आहे. उदाहरणांनी आधिक स्पष्ट करता येते. टिक्की म्हैस विकण्याचा मालक निर्णय घेतो, तेव्हा म्हणतो , " ती म्हस काढून टाकावी आता, म्हातारी झालीया, नुसती दुधाची म्हस ठेवायची. रिकाम्या वैरणीला, फार ढोरं नगंत." ( पृष्ठ - ५ ), " - - - आणि रेड्यास्नी कशाला वल्ली वैरण टाकलीया ही ? चिपाड घालत चला त्यास्नी, बैलाला तेवढी वल्ली वैरण. एखादी पात काढून घालावी - - - असल्या उन्हाळ्यात वल्ला पाला समद्यास्नी काढून ऊस वाळवून घालशील माझा. रेड्यास्नी जपून काय वाट घालायच हाईत ? ( पृष्ठ - ६,७ ), ओपावर आलेल्या पाडीवर चाण्णा सोडायला मालक नकार देतांना म्हणतो, " - - - पर तसं केल्यावर पुढची वासरं चांगली निपजत न्हाईत म्हणं. " ( पृष्ठ - १३ ), मारूत्या घोडा विहिरीत पडतो. त्याला वाट करून वरती काढण्याचा विचार नारबा करतो. मालक म्हणतो, " - - - खुळा काय ? तेवढ्या खर्चात दुसरा घोडा येईल. ( पृष्ठ -५१ ), सित्या , गंग्या या मजुरांना मळ्यात ठेवून नारबा गावात येतो तेव्हा मालक म्हणतो, " - - - पर्पंच्याच्या वाडीची माणसं ती, कुठंची कायबी न्हेऊन इकायची.- - - ( पृष्ठ - ८५ ) बेंदराच्या दिवशी म्हालिंग्या बैलाला अंडी पाजण्यास मालक नकार देतो. - " - - - आरं आता काय धन देणार हाय त्यो बैल ? हाड वैकुंठाला गेल्यात की आता त्याची - - - ( पृष्ठ - ८५ ) थोरली बैलजोडी विकण्याचा मालक निर्णय घेतांना म्हणतो की, " - - - ठेऊन काय अंडी घालणार हाईत ती बैल ? आता उलट त्येंच्या अंगावर मांस चढलाय. बसलेली हाईत , अंगात ताव आलाय. कुणीबी बघितलं तर चार पैसं चढ देईल. उगच सालभर बसवून ठेवण्यात कास फायदा हाय ? वैरणीला रिकामाकार - - - ( पृष्ठ - ११४ ) माळावरील आणि ओढ्याचे सर्व झाडं तोडल्यानंतर पिंपळ तोडू नये असे नारबाला वाटते. तेव्हा मालक म्हणतो, " ठेवून तरी काय फायदा ? ना फळ ना फूल " ( पृष्ठ - १३२ ) या सर्व प्रसंगावरून असे म्हणता येईल की, या यंत्रयुगात उपयुक्ततावादी आणि प्रत्येक गोष्ट पैशात मोजली जात आहे.

त्यामुळे मानवी जीवनात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ग्रामीण भागातील शेतमजुरांवर रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला आहे. कोल्हापुरी बोलीतील नारबाच्या स्वगतावरून बोलीचे स्वरूप हे सभोवतालच्या दैनदिंन जीवनातून साकारलेले असल्याची जाणीव होते. कृषीकेंद्रीत वास्तव हा ग्रामीण भावविश्वाचा गाभा अस्सल कलात्मकतेने व बोलीच्या लयीने अविष्कृत करणारी अव्वल दर्जाची कादंबरी आहे. नारबाचे भावविश्व कोल्हापूर कागल परिसरातल्या ग्रामीण बोलीच्या माध्यमातून लेखकाने यशस्वीपणे उभे केले आहे.

।। ६ ।।

कोल्हापूरच्या परिसरातील बोलीतील अपरिचित आणि नाविण्यपूर्ण शब्द या कादंबरीत समाजवास्तवाचे दर्शन घडवितात. या कादंबरीतील काही शब्द खालीलप्रमाणे दाखविता येतात.

| **कोल्हापूरच्या कागल परिसरातील बोलीतील शब्द** | **मराठी** | **कोल्हापूरच्या कागल परिसरातील बोलीतील शब्द** | **मराठी** |
|---|---|---|---|
| हुतावं | होते | दीस कलतीला | दिवस मध्यांनावर येणे |
| हिरीरिनं | घाईने | फुंड | पुढे |
| वकोत | वेळ | वंगाळ | घाणेरडे |
| न्हाई | नाही | बेंदूर | पोळा |
| न्हेवून | घेऊन | आगुदर | अगोदर |
| म्हसरं | म्हशी | म्हैनाभर | महिनाभर |
| गरवार | पतिव्रता | ढामीण | धामण |
| गाभ | गरोदर | लांबपतोर | लांबपर्यंत |
| निजलो | झोपलो | कवाच | केव्हांच |
| चिखुल | चिखल | ऊरासंग | छातीशी |
| न्याहाळलं | पाहणे | शेरडं | शेळी |

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– III May - June 2021

| | | | |
|---|---|---|---|
| बकरं | बोकड | ताणली | झोपणे |
| इचवं | विंचू | घोळका | गर्दी |
| एकबी | एकही | गेल्ल | जाणे |
| माखलं | पसरणे | मुस्काड | तोंड |
| पाट | सकाळ | च्या | चहा |
| हुक्की | आवाज | त्यास्नी | त्यांनी |
| ईत | इंच | इनाकारण | विनाकारण |
| माखलेली | भरलेली | खुळा | वेडा |

असे अनेक शब्द या कादंबरीला वेगळाच बाज आणतांना दिसतात. **आनंद यादवांच्या** मते, " ग्रामीण कादंबरीचे लेखन हे वाचकाला आवडेल असा विचार करून तिची भाषा नसावी. तर कथानकाच्या मागणीनुसार ती मग बोली असो वा आणखी कोणती याचा विचार न करता लेखन करावे. "

।। ७ ।।

आनंद यादव यांच्या ' गोतावळा '  कादंबरीचे निवेदन आणि संवाद मुळात बोलीमध्ये आहे. आत्मनिवेदन आणि स्वगतसुध्दा बोलीतूनच लेखकाने रेखाटल्यामुळे कादंबरीतील घटना वास्तव आणि जिवंत वाटते. निवेदन आणि स्वगत जणू एकजिव होवून प्रकट झाल्याची जाणीव पदोपदी येतांना दिसते. तसेच म्हणी किंवा वाक् प्रचाराचाही मोठ्या खुबीने आनंद यादवांनी वापर केला आहे. उदा. पोटात शिंग घुसल्यागत होते, मन पिकागत डवरणे, जीव नसल्यागत वाटणे, दोनाचे चार हात करणे, तोंड असून जीभ नसणे, ना फळ ना फूल, दिल्या दामाचे आणि सांगितल्या कामाचे , ना घर ना दार, हत्ती गेला नि शेपूट अडकली, पाणी मणकं मोडलेल्या सापागत चालणे, काळ्या रानावर हिरवी साय येणे, रावणागत हात पसरणे, भराला आलेल्या बाईगत फुलणे, गुदगुल्या होणे, पोटात बियाणे पडणे, मोरागत जगणे, जल्माचं वाटुळं होणे, उताणं होणे, भुंड्या बाईगत रिकामा दिसणे, नारळाचे तीन तुकडे होणे, पोटात कालीवल्यागत होणे, खुळ्यात काढणे, सजावारी चौकशी करणे, पाण्याचं वावडं असणे, आतड्यात पाल फिरल्यागत

वाटणे, तोंडचे पाणी सुटणे, डोळे कोल्ह्यागतं हलणे, फोडून काढणे, अशा अनेक प्रतिमा , प्रतिकांचा वापर करून आनंद यादवांनी कादंबरीला अधिक उठावदारपणा देण्यात यशस्वी झालेले आहेत.

गोतावळ्यामध्ये नारबाच्या निवेदनाकडे पाहिले असता दैनदिन वापरात ग्राम्य किंवा अश्लील वाटणारे शब्द या कादंबरीत ग्राम्य,अश्लील वाटत नाही. उलट नारबाच्या निवेदनातील वाक्य अश्लीलपणापासून फार दूर घेऊन जातात. निवेदनाशी एकजीव झाल्याची जाणीव होते. नारबाचे अतृप्त मन यातून चित्रित होते. उदा. अंगात ढोरागत रग हाय. मला काय वाटत असंल ? का आम्हीबी अंड ढाडविलेला खोडच ! - - - ( पृष्ठ - १५ ) बाई नि बापयं एकातच पाहिजे हुतं. किती एकटं ऱ्हायचं ? ( पृष्ठ - ६४ ) आयला कावळा नि कावळीण एका जागी दिसत नाहीत. रातचं घरट्यात एक हुईत असतील ! ( पृष्ठ - १११ ) पाडीची रूखरूख - - - माझ्या का हातात हाय ते ? पाडा असतो तर एक गोष्ट न्यारी - इच्यारानं माझं मलाचं हसू आलं ( पृष्ठ - १६ ) माजलेला कोंबडा चिडून जाऊन पोरावरच काय हत्तीवर सुदीक धावून जाईल. माणसागत त्यो काय गप्प बसणार हाय ? ( पृष्ठ - २३ ) आयला एक बैलबी हुयाला येत नाही - - - माणसाच्या बैलाला नेमून दिलेली गाय म्हंजे आम्हाला दोन्हीकडून चिमटा. माणूस असूनबी जनावरात जगणं. आणि जनावरात जगणं असुनबी जनावर न्हाई. ( पृष्ठ - २५ ) गोतावळ्याची भाषा ही प्रतिमांची वाटते. या भाषेमध्ये जशी लय आहे. तशी जीवनातील विविध भावसूत्रे टिपण्याची ताकदही आहे. संवेदनाचा, सौंदर्याचा सुक्ष्म आविष्कार करणारी आनंद यादवांनी या कादंबरीतील भाषा योजिली आहे.

॥ ८ ॥

आनंद यादवांनी ' गोतावळा ' या कादंबरीच्या आशय अभिव्यक्तीसाठी माध्यम म्हणून कोल्हापूर भागातील ग्रामीण बोली भाषेचा वापर केलेला आहे. ' नारबा ' या पात्राच्या माध्यमातून शेतमजुरी करणाऱ्या मजुराची शोकांतिका व्यक्त करणारे कथानक रचले आहे. नारबाची शोकांतिका तीव्र करण्यासाठी आणि वास्तविकता निर्माण करण्यासाठी पात्रांच्या तोंडी वापरलेली निवेदनाची जी भाषा लेखक आनंद यादवांनी वापरली आहे ती अस्सल स्वरूपाची आहे. कादंबरी वाचतांना आपल्या डोळ्यासमोर घडत असल्याचा भास होतो. शब्दांच्या माध्यमातून ग्रामीण भागातील चित्रण जिवंत स्वरूपात उभे करण्यात आनंद यादव यशस्वी झाले आहे. जनावरे आणि पशुपक्षानांही आनंद यादवांनी जिवंत साकार केले आहे. **अरविंद वामन कुलकर्णीच्या** मते - " नारबाचा हा सारा गोतावळा तसा मुका आहे. म्हणजे शब्दांच्या आधारावर तो स्वत:ला व्यक्त करू शकत नाही. यादवांनी लेखकाला मिळू शकणारे स्वातंत्र सोडून या गुराढोरांचा मुकेपणा जसाच्या तसा साकारलेला आहे. पण मोठ्या कौशल्याने त्यांनी प्रत्येक ढोराला स्वतंत्र

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– III May - June 2021

व्यक्तिमत्त्व दिलेलं आहे. गाय, बैल, रेडे, कासव, म्हैस यांना गोतावळ्यात स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. " आनंद यादवांनी गिधाडाचे केलेले वर्णन भाषेचा सुंदर नमुना आहे. " गुडघ्यापतोर पांढऱ्या पिसाची चड्डी, अंगावर पावसाळी दांगडगा कोट " यातून गिधाडाचे व्यक्तिमत्त्व उभे राहते. " राघवाच्या पिलाला नुकतीच हिरवी पंख फुटावित तसं दिसत हुतं " या वर्णनाने माळही जिवंत केला आहे.

।।९ ।।

आनंद यादव यांच्या ' गोतावळा ' या कादंबरीविषयी अनेक तज्ज्ञ, विचारवंत, समीक्षक यांनी आपली मते नोंदविलेली आहे. यातील काही तज्ज्ञांची मते खालीलप्रमाणे विचारात घेता येतात.

- **श्री .कृ. बोरकर** : ' चिरंतर दु:खाचा धगधगता प्रत्यय - गोतावळा.'
- **नामदेव ढसाळ** : ' गोतावळा - एक श्रेष्ठ व सकस कादंबरी.'
- **आवटी** : ' गोतावळा - बदलत्या ग्रामीण जीवनाचे चटका लावणारे चित्र.'
- **वा.ल. कुलकर्णी** : ' मराठी कादंबरीला नवे परिणाम देणारी कादंबरी.'
- **डॉ. अ.वा.कुलकर्णी** : ' सर्वार्थाने पहिली मराठी कादंबरी.'
- **डॉ. भालचंद्र फडके** : " गोतावळामध्ये आनंद यादवांनी नारबाचे भावविश्व रंगवून तिला शोकात्मिकतेची उंची प्राप्त करून दिली आहे. नारबाचे एकाकीपण आपल्या अनुभवविश्वाचा विषय बनते. आपल्या शुद्र स्वार्थासाठी मालक नारबाला एकाकीपणाच्या आगीत झोकून देतो. त्याच्या जीवनात निर्माण झालेल्या भयानक पोकळीचे घडणारे दर्शन आपल्याला भारावून टाकते, अस्वस्थ करते. "
- **डॉ. भालचंद्र फडके** : " निसर्ग आणि माणूस यांच्यातील भावसंबंध चित्रविषय बनविण्यात आनंद यादवाच्या प्रतिभेचे एक अपूर्व देखणेपण प्रत्ययास येते. आणि दुसरे असे की, ही कादंबरी वाचतांना तिच्या भाषेची वेगळी अशी जाणीव होत नाही. या भाषेने ज्यांना बोली नाही त्या प्राणिसृष्टिलापण बोलके केले आहे. गोतावळा सारख्या कादंबरीमुळे मराठी कादंबरीचे क्षितिज विस्तारले आहे एवढे मात्र निश्चित. "

।।१० ।।

❖ **सारांश :** ' गोतावळा ' या कादंबरीचा भाषिक अभ्यास म्हणजे या कादंबरीतील कोल्हापुरी भाषेच्या शब्दांचा, शब्दबंधाचा, वाक्याचा, निवेदनाचा, संवादाचा, ग्रामीण भागात बोलल्या जाणाऱ्या संवादाचा, म्हणी व वाक्प्रचाराचा,

ISSN–2278-5655
AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL
Volume–X, Issues– III May - June 2021

गावरान शिव्यांचा, अश्लील व ग्राम्य बोलींचा, समीक्षकांनी मांडलेल्या विचारांचा, प्रतिमा - प्रतिकांचा, स्वगताचा, काव्यमयतेचा, सूचकतेचा घेतलेला थोडक्यात परामर्श या सर्व मुद्यांच्या आधारे धावता आढावा सदर लेखात मांडण्याचा प्रयत्न आहे.

❖ **संदर्भ :**


- आनंद यादव ( १९७१ ), गोतावळा, मौज प्रकाशन, पुणे.
- कीर्ती आनंद यादव ( संपा. ) आनंद यादव यांची गोतावळा - साद आणि प्रतिसाद
- भास्कर शेळके , मराठी प्रादेशिक कादंबरी - स्वरूप आणि विश्लेषण
- आनंद यादव ( १९९८ ) आत्मचरित्र मींमासा, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे.